Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. १४ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६९ । पाने २ । DIGITAL EDITION

चौघांच्या टोळीकडून १८ मोटार सायकली जप्त!
(पान २ वर)



Selected

## जळगाव जिल्हा समन्वयकपदी दिपक पाटील यांची निवड

यावल : यावल तालुक्यातील साकळी महाराष्ट्र मधील सरपंच व ग्रामपंचायतींच्या सक्षम न्याय व हक्कासाठी कायम कार्यरत असणारी सरपंच परिषद,मुंबई (महाराष्ट्र) संघटनेच्या जळगाव जिल्हा समन्वयक पदावर साकळी ता.यावल येथील लोकनियुक्त सरपंच दिपक नागो पाटील यांची संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे व राज्य कार्यकारिणीच्या मान्यतेने निवड करण्यात आली. लोकनियुक्त सरपंच दिपक पाटील यांनी आपल्या सरपंचपदाच्या अडीच वर्षाच्या काळात गावात पायाभूत सुविधांची कामे,विविध विकास कामे यासह महिला,बालिका,दिव्यांग यांच्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरून विविध 'लोकल्याणकारी ' योजना-उपक्रम राबवून नावलौकिक मिळविला आहे त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीचा कारभार ' डिजिटल ' करून गावातील नागरिकांना ग्रामपंचायतीच्या डिजिटल सेवेचा लाभ घेता येणार आहे.

### रेश्मा काळेंनी उमेदवारी मागे घेतल्याने भाजप उमेदवार महाजन यांच्या विजयाचा मार्ग मोकळा

# नाशिकमध्ये 'हॉटेल पॉलिटिक्स'ची चर्चा; रेश्मा काळेंची माघार

## नाशिकमध्ये नगरसेवकांचे प्रशिक्षण शिबिर तर जळगावात एकनाथ शिंदेंच्या हस्तक्षेपानंतर बंड शमले

जन सम्राट टाईम्स

**नाशिक / जळगाव : :** विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि जळगाव या दोन्ही जिल्ह्यांतील राजकीय घडामोडींना मोठी गती आली आहे. नाशिकमध्ये शिवसेनेच्या नगरसेवकांना ठाण्यातील रिसॉर्टमध्ये नेण्यात आल्याने 'हॉटेल पॉलिटिक्स'ची चर्चा रंगली असताना, जळगावात शिवसेना शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर निवडणुकीतून माघार घेत महायुतीतील तणावावर पडदा टाकला आहे.

नाशिकमध्ये १८ जून रोजी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे सर्व नगरसेवक बसने ठाण्याकडे रवाना झाल्याची माहिती समोर आली. नगरसेवकांसाठी एका रिसॉर्टमध्ये मुक्कामाची व्यवस्था करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. यामुळे पुन्हा एकदा 'हॉटेल पॉलिटिक्स'चा मुद्दा चर्चेत आला. मात्र, या चर्चांना उत्तर देताना शिवसेना नेते तथा नाशिकचे उपमहापौर विलास शिंदे यांनी ही सहल नसून नगरसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर असल्याचे स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकीतील मतदानाची प्रक्रिया वेगळी असल्याने नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना मतदानाची



पद्धत, संघटनात्मक समन्वय आणि स्थानिक प्रशासनातील कामकाजाबाबत वरिष्ठ नेत्यांकडून मार्गदर्शन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विलास शिंदे यांनी महायुतीच्या विजयाबाबतही ठाम विश्वास व्यक्त केला. "महायुतीकडे ५५० हून अधिक मतांचे संख्याबळ आहे. शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या जागेसाठी मित्रपक्षांचे नगरसेवकही आम्हालाच मतदान करतील. त्यामुळे राज्यातील सर्व १७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील," असा दावा त्यांनी केला. दरम्यान, जळगाव विधान परिषद निवडणुकीतही नाट्यमय घडामोडी घडल्या. महायुतीकडून भाजपचे नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी कायम ठेवली होती. त्यामुळे महायुतीमध्ये बंडाचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, रेश्मा काळे यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर मंत्री गिरीश महाजन आणि पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पत्रकार परिषद घेत या निर्णयाची माहिती दिली. यावेळी गिरीश महाजन म्हणाले की, "उमेदवारी नाकारली गेल्यानंतर नाराजी असणे स्वाभाविक आहे. मात्र, रेश्मा काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शब्दाला मान देत महायुतीच्या हितासाठी मोठा निर्णय घेतला आहे. त्यागाची भावना ठेवून त्यांनी माघार घेतल्यामुळे त्यांच्या मनात वेदना असल्या तरी त्यांनी पक्षहिताला प्राधान्य दिले आहे." मात्र, या चर्चांना उत्तर देताना शिवसेना नेते तथा नाशिकचे उपमहापौर विलास शिंदे यांनी ही सहल नसून नगरसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर असल्याचे स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकीतील मतदानाची प्रक्रिया वेगळी असल्याने नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना मतदानाची पद्धत, संघटनात्मक समन्वय आणि स्थानिक प्रशासनातील कामकाजाबाबत वरिष्ठ नेत्यांकडून मार्गदर्शन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विलास शिंदे यांनी महायुतीच्या विजयाबाबतही ठाम विश्वास व्यक्त केला. "महायुतीकडे ५५० हून अधिक मतांचे संख्याबळ आहे.

### महायुतीचा मार्ग सुकर

रेश्मा काळे यांच्या माघारीमुळे भाजपचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या विजयाचा मार्ग अधिक सुकर झाल्याचे मानले जात आहे. आता १८ जून रोजी होणाऱ्या मतदानाकडे आणि २२ जूनला जाहीर होणाऱ्या निकालाकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून नाशिकमधील प्रशिक्षण शिबिर आणि जळगावातील बंड शमविण्याची रणनीती महायुतीला कितपत लाभदायक ठरते, याची उत्सुकता वाढली आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## शेअर बाजारातील आर्थिक फटक्याने संपवले अख्खे कुटुंब

### २२ पानी सुसाईड नोट पोलिसांच्या हाती

जन सम्राट टाईम्स

**नंदूरबार | प्रतिनिधी:** शेअर बाजारातील मोठ्या आर्थिक नुकसानीच्या तणावातून वैराग (जि. सोलापूर) नंदूरबार जिल्हयातील चौगाव (खु) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाने पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलांना विष पाजल्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक घटना बाशी तालुक्यातील हातीज येथे उघडकीस आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शिक्षण क्षेत्रासह सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. मृतांमध्ये योगेश बाळासाहेब पाटील (वय अंदाजे ४०), पत्नी माधुरी पाटील (वय ३७), मुलगा अथर्व (वय ११) आणि शिवांश (वय ९) यांचा समावेश आहे. योगेश पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील चौगाव (खुर्द) येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. प्राथमिक माहितीनुसार, शेअर बाजारातील मोठ्या आर्थिक तोट्यामुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनास्थळावरून पोलिसांना तब्बल २२ पानी सुसाईड नोट मिळाली असून त्यामध्ये आर्थिक व्यवहार, शेअर बाजारातील नुकसान, घेतलेली कर्जे तसेच मालमत्तेबाबतच्या काही इच्छांचा उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे.



#### पुराव्यांच्या आधारे पोलिसांचा तपास सुरू

ही घटना गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली असावी, असा प्राथमिक अंदाज वैराग पोलिसांनी व्यक्त केला आहे. शुक्रवारी सकाळी दूध देण्यासाठी आलेल्या व्यक्तीने घराचा दरवाजा ठोठावला असता बराच वेळ कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. सुसाईड नोट आणि अन्य पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला असून नेमकी घटना कोणत्या परिस्थितीत घडली, याचा सखोल तपास केला जात आहे

## नशिराबादमध्ये अमृत योजनेच्या कामावर उघडपणे वीज चोरीचा आरोप

### महावितरणच्या डी.पी.मधून थेट वायर जोडल्याचा दावा; लेखी तक्रार दाखल, संबंधितांवर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** नशिराबाद नगरपरिषदेअंतर्गत सुरू असलेल्या अमृत योजनेच्या पाणीपुरवठा वाहिनीच्या कामादरम्यान महावितरणच्या डी.पी. (रोहित्र) मधून थेट अनधिकृतरीत्या वीज घेण्यात आल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या कथित प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, संबंधित ठेकेदार आणि कामगारांविरोधात कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या कामासाठी नियुक्त ठेकेदार विलास जगताप यांच्या कामगारांनी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता महावितरणच्या डी.पी.मधून थेट मुख्य सर्व्हिस वायर जोडून वीज वापर केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिक



नागरिक धनराज रंधे आणि रोहित माळी यांनी घटनास्थळी जाऊन संबंधित कामगारांना जाब विचारला. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये नागरिक वीज वापराबाबत प्रश्न उपस्थित करताना दिसत असून, "सामान्य नागरिक नियमितपणे वीज बिल भरतात, मग ठेकेदारांना अशा प्रकारे वीज वापरण्याची मुभा कोणी दिली?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वेल्डिंग मशीन आणि जेसीबीसाठी वापरल्या जाणाऱ्या वायर्स थेट डी.पी.च्या फ्यूजला जोडलेल्या आढळून आल्या. तसेच घटनास्थळी उपस्थित असलेल्या जेसीबी चालकाकडे वाहनाची आवश्यक कागदपत्रे आणि चालक परवाना उपलब्ध नसल्याचाही दावा करण्यात आला आहे. वारंवार मागणी करूनही संबंधितांनी कागदपत्रे न दाखवल्याने या यंत्रसामग्रीबाबतही संशय व्यक्त करण्यात आला. यापूर्वीही संबंधित ठेकेदाराच्या कामगारांकडून अशाच प्रकारे वीज चोरी झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून, त्यावेळी केवळ समज देऊन प्रकरण निकाली काढण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र पुन्हा तोच प्रकार घडल्याने संतप्त नागरिकांनी थेट महावितरणच्या नशिराबाद उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता कार्यालयात धाव घेत लेखी तक्रार दाखल केली असून त्याची अधिकृत पोचपावतीही घेतली आहे.

## सुरेश वाडकर यांनी घेतली नाजीम शेख यांची भेट

### संस्कृती आणि सामाजिक विषयांवर मनमोकळा संवाद

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** : भारतीय संगीतविश्वातील ज्येष्ठ आणि ख्यातनाम गायक पद्मश्री सुरेश वाडकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाचे धुळे जिल्हाध्यक्ष नाजीम शेख यांनी मंत्रालयात सदिच्छा भेट घेतली. ही भेट अत्यंत आपुलकीच्या वातावरणात पार पडली असून संगीत, संस्कृती आणि सामाजिक विषयांवर दोघांमध्ये मनमोकळी चर्चा झाली. या भेटीदरम्यान नाजीम शेख यांनी सुरेश वाडकर यांच्या साधेपणाचे, नम्र स्वभावाचे आणि संगीत क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचे विशेष कौतुक केले. "त्यांचा साधेपणा, कलेप्रती असलेली निष्ठा आणि रसिकांशी असलेले आत्मीय नाते आजही प्रेरणादायी आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. भारतीय चित्रपटसृष्टीत आणि मराठी संगीतविश्वात सुरेश वाडकर यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाच्या जोरावर अजरामर ठसा उमटवला आहे. हिंदी आणि मराठी चित्रपटांमधील असंख्य गाजलेल्या गीतांना त्यांनी स्वर दिले असून त्यांच्या गायकीतील शास्त्रीय बैठक, शब्दोच्चारातील नेमकेपणा आणि भावपूर्ण सादरीकरणामुळे त्यांनी अनेक दशकांपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. 'प्रेम रोग', 'चांदनी', 'हिना', 'राम तेरी गंगा मैली', 'कुली', 'उत्सव', 'प्यासा सावन', 'विधाता', 'सदमा' आणि



अन्य अनेक चित्रपटांतील त्यांच्या गाण्यांनी संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध केले आहे. त्यांच्या आवाजातील भावस्पर्शी शैली आणि सुरेल सादरीकरणामुळे आजही त्यांच्या गीतांना विशेष लोकप्रियता लाभत आहे. भेटीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना नाजीम शेख म्हणाले, "सुरेशजींच्या स्वरांमध्ये एक विलक्षण शांतता, संवेदनशीलता आणि आत्मीयता आहे. मंत्रालयात झालेली ही भेट माझ्यासाठी अविस्मरणीय असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली." या प्रसंगी अल्पसंख्यांक सेवा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष जहांगीर खान, अरबाज शेख तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी सुरेश वाडकर यांच्या संगीत कारकिर्दीचा गौरव करत त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकार आणि सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्यात झालेल्या या सदिच्छा भेटीमुळे सांस्कृतिक आणि सामाजिक संवादाला नवे बळ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## 'बीएलओ' ड्युटी टाळणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई

### ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांनी 'बूथ लेव्हल ऑफिसर' (BLO) म्हणून तातडीने रुजू व्हावे, असे कडक निर्देश मुंबई शहर निवडणूक कार्यालयाने दिले आहेत. नियुक्ती असूनही ड्युटीवर हजर न राहणाऱ्या शिक्षकांविरोधात थेट स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मतदार याद्यांच्या विशेष पडताळणी मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षक आणि शासकीय कर्मचाऱ्यांची बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक शिक्षक गावाकडे गेल्याने ते अद्याप ड्युटीवर रुजू झालेले नाहीत. त्यामुळे पडताळणी मोहिमेच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी जोशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन नाराजी व्यक्त केली. निवडणुकीसारख्या महत्त्वाच्या शासकीय कामात हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी गैरहजर राहणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात सर्व निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना संबंधित बीएलओंना तातडीने हजर होण्याचे आदेश देण्यास सांगण्यात आले आहे. आदेशांचे पालन न केल्यास संबंधितांविरोधात स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. मतदार याद्यांची अचूकता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी विशेष सखोल पडताळणी मोहीम




अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे या कामात नियुक्त सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वेळेत रुजू होऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे बीएलओ ड्युटीवर नियुक्त शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, आगामी काळात गैरहजेरीबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

#### सखोल पडताळणी मोहीम महत्त्वाची

यासंदर्भात सर्व निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना संबंधित बीएलओंना तातडीने हजर होण्याचे आदेश देण्यास सांगण्यात आले आहे. आदेशांचे पालन न केल्यास संबंधितांविरोधात स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी विशेष सखोल पडताळणी मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे या कामात नियुक्त सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वेळेत रुजू होऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## वीर एकलव्य महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

### चार ग्रामसंघांना २४ लाख ९० हजार रुपयांच्या निधी; महिला व बचत गटांचा गौरव

जन सम्राट टाईम्स



**शहादा | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पंचायत समिती शहादा आणि जिल्हा परिषद गट सुलतानपूरच्या कार्यक्षेत्रातील 'वीर एकलव्य महिला प्रभाग संघाची' वार्षिक सर्वसाधारण सभा १२ जून २०२६ रोजी विविध उपक्रमांनी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत चार ग्रामसंघांना एकूण २४ लाख ९० हजार रुपयांच्या सीआयएफ व आयएफसी प्रकल्प निधीचे धनादेश वितरित करण्यात आले, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला, स्वयं सहाय्यता बचत गट आणि ग्रामसंघांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कुलदेवी याहमोगी माता, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थितांनी "इतनी शक्ती हमे देना दाता..." ही प्रार्थना म्हणत सभेच्या कामकाजाला प्रारंभ केला. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रभाग संघाच्या अध्यक्षा अनिता भामरे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सचिव शकुंतला पावरा, ममता वळवी तसेच गणोर ग्रामपंचायतीच्या सरपंच शितल रावताळे उपस्थित होत्या. महिलांना विविध शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी तालुका व्यवस्थापक ईश्वर जगदाळे, बीएम-एमआयएस किशोर बिरारे, बीएम-एसआयआयबी दिलीप बैसाने, सहकारी प्रभाग समन्वयक राजेश देवकर, हर्षल पाटील, योगेश कोळी आणि सुचिता सूर्यवंशी उपस्थित होते. उद्योजकता विकास आणि शाश्वत उपजीविकेच्या संधींबाबत महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रभाग समन्वयक विद्या वसावे यांनी प्रभागात सुरू असलेल्या विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेतला. त्यानंतर प्रभागाच्या लेखापाल कविता भामरे यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सादर केला. उपस्थित सदस्यांनी या अहवालास सर्वानुमते मंजुरी दिली.सभेतील विशेष आकर्षण म्हणजे चार ग्रामसंघांना त्यांच्या मागणीनुसार २४ लाख ९० हजार रुपयांच्या सीआयएफ व आयएफसी प्रकल्प निधीचे धनादेश सरपंच शितल रावताळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या निधीमुळे विविध स्वयंरोजगार व महिला सक्षमीकरण उपक्रमांना गती मिळणार असल्याचे सांगण्यात आले. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सीआरपी ताई, नियमित कर्ज परतफेड करणारे महिला स्वयं सहाय्यता समूह, सामाजिक समावेशनासाठी योगदान देणारे ग्रामसंघ तसेच उद्योग-व्यवसाय उभारून यशस्वी वाटचाल करणाऱ्या उत्पादक गटांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

#### महिला सक्षमीकरण उपक्रमांना गती

महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि ग्रामीण विकासाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.. सभेतील विशेष आकर्षण म्हणजे चार ग्रामसंघांना त्यांच्या मागणीनुसार २४ लाख ९० हजार रुपयांच्या सीआयएफ व आयएफसी प्रकल्प निधीचे धनादेश सरपंच शितल रावताळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या निधीमुळे विविध स्वयंरोजगार व महिला सक्षमीकरण उपक्रमांना गती मिळणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रभाग समन्वयक राजेश देवकर यांनी केले, तर उपस्थित सर्व सीआरपी, ग्रामसंघ पदाधिकारी आणि बचत गटांच्या महिलांचे आभार प्रभाग संघाच्या अध्यक्षा अनिता भामरे यांनी मानले.

# ‘80 टक्के नालेसफाई’च्या दाव्याची शिवसेना उबाठाकडून पोलखोल!

## ‘ऑन द स्पॉट’ पाहणीत गंभीर अनियमिततेचा आरोप



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेने शहरातील ८० टक्के नालेसफाई पूर्ण झाल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये नाले कचऱ्याने तुडुंब भरलेले असून साफसफाईचे काम सुरूही झालेले नाही, असा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केला आहे.

नागरिकांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागांतील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाच्या दाव्याची पोलखोल केल्याचा दावा करण्यात आला आहे. शिवसेना उबाठा पदाधिकाऱ्यांनी शहरातील सुमारे ४० किलोमीटर लांबीच्या नाल्यांची पाहणी केली. या पाहणीत अनेक ठिकाणी केवळ दर्शनी भागात थातूरमातूर साफसफाई करण्यात आल्याचे दिसून आले. तर काही नाल्यांमध्ये अद्याप कोणत्याही प्रकारची स्वच्छता मोहीम राबविण्यात आलेली नसून ते कचऱ्याने भरलेले असल्याचा आरोप करण्यात आला. पक्षाच्या म्हणण्यानुसार मोती नाला, सुशी नाला, हगरया नाला, भरतनगर, तुळशीराम नगर, प्रोफेसर कॉलनी, जीटीपी परिसर, सिंचन भवनामागील नाला, मिलचा नाला तसेच सिव्हिल हॉस्पिटल परिसरातील नाल्यांची स्थिती अद्यापही ‘जैसे थे’ असून त्या ठिकाणी प्रभावी नालेसफाई झाल्याचे कोणतेही चित्र दिसून येत नाही. विशेषतः भरतनगर परिसरातील नाल्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा दावा करत, यामुळे यंदाच्या पावसाळ्यात नकाणे रोड आणि वाडीभोकर कॉलनी परिसरातील घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, असा इशाराही शिवसेनेने दिला आहे. महापालिका आयुक्तांनी कार्यालयात बसून केवळ ऑनलाइन बैठका घेण्यापेक्षा प्रत्यक्ष शहरात येऊन पाहणी करावी, असे खुले आव्हान देत शिवसेना उबाठाने, “आमच्यासोबत या, नालेसफाईचा खरा कारनामा दाखवतो,” अशी भूमिका मांडली. याशिवाय नालेसफाईसाठी पूर्वी सुमारे ५० लाख रुपयांत होणारे काम आता तब्बल २५० लाख रुपयांच्या वाढीव निविदेद्वारे करण्यात येत असल्याचा आरोपही करण्यात आला. या अतिरिक्त २०० लाख रुपयांच्या खर्चामागील कारणांची चौकशी व्हावी आणि या निधीचा लाभ नेमका कोणाला होणार, असा सवाल पक्षाने उपस्थित केला आहे. धुळेकर नागरिकांनी आपल्या कराच्या पैशांचा योग्य वापर होत आहे का, याबाबत जागरूक राहावे आणि सार्वजनिक निधीच्या कथित अपव्ययाविरोधात आवाज उठवावा, असे आवाहनही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आले.वसेना उबाठा पदाधिकाऱ्यांनी शहरातील सुमारे ४० किलोमीटर लांबीच्या नाल्यांची पाहणी केली. दर्शनी भागात थातूरमातूर साफसफाई करण्यात आल्याचे दिसून आले. तर काही नाल्यांमध्ये अद्याप कोणत्याही प्रकारची स्वच्छता मोहीम राबविण्यात आलेली नसून ते कचऱ्याने भरलेले असल्याचा आरोप करण्यात आला. पक्षाच्या म्हणण्यानुसार मोती नाला, सुशी नाला, हगरया नाला, भरतनगर, तुळशीराम नगर, प्रोफेसर कॉलनी, जीटीपी परिसर, सिंचन भवनामागील नाला, मिलचा नाला तसेच सिव्हिल हॉस्पिटल परिसरातील नाल्यांची स्थिती अद्यापही ‘जैसे थे’ असून त्या ठिकाणी प्रभावी नालेसफाई झाल्याचे कोणतेही चित्र दिसून येत नाही.

### यांची होती उपस्थिती

या पाहणीवेळी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, तेजस गोटे, निंबा मराठे, प्रशांत ठाकूर, प्रभादेवी परदेशी, जयश्री वानखेडे, आनंद जावडेकर, कपिल लिंगायत, निलेश कांजरेकर, मुन्ना पठाण, ईश्तियाक अन्सारी, राजू पाटील, तेजस सपकाळ आणि गुलाब धोबी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चौघांच्या टोळीकडून १८ मोटारसायकली जप्त!

## मोटारसायकल चोरीचे ९ गुन्हे उघडकीस

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी :** जिल्ह्यात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत साक्री पोलिसांनी उल्लेखनीय यश मिळवत चार जणांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या टोळीच्या ताब्यातून तब्बल १८ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या असून मोटारसायकल चोरीचे ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईमुळे वाहनचोरांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. धुळे जिल्ह्यातून चोरी होणाऱ्या मोटारसायकली आणि त्यामागील चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व पोलीस ठाण्यांना दिले होते. त्यानुसार साक्री पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक १६८/२०२६ अंतर्गत मोटारसायकल चोरीच्या प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांना महत्त्वाची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे दि. १२ जून २०२६ रोजी साक्री पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दीपक वळवी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने निलेश रमेश खैरनार (वय ३२, रा. म्हसदी, ता. साक्री) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने आपल्या साथीदारांसह परिसरातून मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. या प्रकरणात त्याचे फरार साथीदार दिशांत रामदास अहिरे (वय २६), एक विधिसंघर्षग्रस्त बालक आणि विशाल राजेंद्र अहिरे (वय २४), सर्व रा. जायखेडा, ता. सटाणा, जि. नाशिक यांनी संगनमत करून साक्री व परिसरातून विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याचे समोर आले. आरोपींच्या कबुलीजबाबानंतर पोलिसांनी त्यांनी लपवून ठेवलेल्या एकूण १८ मोटारसायकली जप्त केल्या. या वाहनांच्या आधारे मोटारसायकल चोरीचे ९ गुन्हे उघडकीस आले असून इतर गुन्ह्यांबाबतही तपास सुरू आहे. या टोळीने आणखी कुठे आणि किती चोरीच्या घटना घडवल्या आहेत, याचा शोध पोलीस घेत आहेत. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत प्रभारी पोलीस निरीक्षक दीपक वळवी, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल बागुल, विकास शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद रौंदळ, राजू जाधव तसेच पोलीस अंमलदार बापू रायते, संदीप सावळे, मयूर चौधरी, नारायण चव्हाण, साईनाथ पवार, सुशीलकुमार सूर्यवंशी आणि अमोल पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. साक्री पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे वाहनचोरीच्या घटनांवर अंकुश बसण्यास मदत होणार असून नागरिकांनीही आपल्या वाहनांच्या सुरक्षेबाबत अधिक दक्ष राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईस | ब्रेक न्यूज | ज

# लक्झरीच्या चाकाखाली सापडून तिघांचा जागीच मृत्यू

## पारोळा रोडवरील दुर्घटनेने खळबळ

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहरातील पारोळा रोड परिसरात शनिवारी पहाटे भीषण अपघात होऊन तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. रस्ता ओलांडत असताना भरधाव लक्झरी बसच्या चाकाखाली सापडल्याने तिघांचा मृत्यू झाला असून या दुर्घटनेचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून आझादनगर पोलिसांनी लक्झरी चालकाविरोधात गुन्हा दाखल करत त्याला ताब्यात घेतले आहे. या अपघातात वरखेडी येथील सुभाष लोटन धनगर (वय ४२), निलेश संभाजी पाटील (वय ३९) आणि सिंधुबाई शांताराम पाटील (वय ८३) यांचा जागीच मृत्यू झाला. तिघांच्याही अकाली निधनामुळे वरखेडी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील सुरत येथून जळगाव जिल्ह्यातील शेंदुर्णीकडे जाणारी लक्झरी बस (क्रमांक AR 11 B 9191) पारोळा रोड परिसरातून जात होती. त्याचवेळी वरखेडीहून धुळे बसस्थानकाच्या दिशेने निघालेल्या दुचाकीस्वारांनी रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान भरधाव लक्झरी बसच्या चाकाखाली



ते सापडल्याने भीषण अपघात झाला आणि तिघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच आझादनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातग्रस्त लक्झरी वाहन जप्त करून चालक अशोक पाटील (वय ३८, रा. पाचोरा) याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आझादनगर पोलीस करत आहेत.

### आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी

या भीषण अपघातामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. पारोळा रोड परिसरात वाहतुकीचा वेग नियंत्रित करण्यासाठी स्पीड ब्रेकर उभारावेत तसेच रस्ता सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना आणि पुरेशा प्रकाशव्यवस्थेसह विद्युत खांबांची उभारणी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# थकीत मार्जिन देण्याची जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारांची मागणी

## जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे मागील सात ते आठ महिन्यांपासूनचे लाखो रुपयांचे थकीत मार्जिन तातडीने वितरित करण्यात यावे, तसेच मे आणि जून महिन्याच्या धान्य वितरणाची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी जळगाव जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सरकारकडून अनुदान आणि कमिशन वेळेत मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदार गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. मागील सात ते आठ महिन्यांपासून लाखो रुपयांचे मार्जिन थकीत असल्याने दुकानदारांना घरखर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, दुकानांचे भाडे, वीजबिल आणि इतर दैनंदिन खर्च भागवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संघटनेने यापूर्वीही मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला असल्याचे सांगितले.



मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय शासनाने सक्तीची केलेली ई-केवायसी प्रक्रिया आणि त्यातील तांत्रिक अडचणींचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. इंटरनेट सेवा वारंवार खंडित होत असल्याने ईपीओएस मशीन बंद पडतात. परिणामी लाभार्थ्यांना वेळेवर धान्य वितरण करण्यात अडथळे निर्माण होतात. अनेकदा तांत्रिक बिघाडामुळे ग्राहक आणि दुकानदारांमध्ये वाद निर्माण होण्याची वेळ येत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. या सर्व समस्यांचा विचार करून थकीत कमिशन तातडीने वितरित करावे, ई-केवायसी प्रक्रियेसाठी तांत्रिक सुविधा सक्षम कराव्यात आणि मे-जून महिन्याच्या धान्य वितरणासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ पाटील, जिल्हा सचिव सुनीलभाऊ अंभोरे, जिल्हा संघटक बाळाभाऊ भालशंकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कैलास उपाध्याय, भुसावळ तालुका अध्यक्ष महेंद्रभाऊ सपकाळे तसेच यावल तालुका अध्यक्ष दिलीप मोरे उपस्थित होते.

### तांत्रिक अडचणींचाही निवेदनात उल्लेख

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सरकारकडून अनुदान आणि कमिशन वेळेत मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदार गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. मागील सात ते आठ महिन्यांपासून लाखो रुपयांचे मार्जिन थकीत असल्याने दुकानदारांना घरखर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, दुकानांचे भाडे, वीजबिल आणि इतर दैनंदिन खर्च भागवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संघटनेने यापूर्वीही मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला असल्याचे सांगितले. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय शासनाने सक्तीची केलेली ई-केवायसी प्रक्रिया आणि त्यातील तांत्रिक अडचणींचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे.

# युवासेना जिल्हाध्यक्षपदी विश्वजितराजे पाटील नियुक्त

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना संसदीय नेते, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देण्यासाठी विश्वजितराजे मनोहर पाटील यांची युवासेना जिल्हाध्यक्ष (रावेर लोकसभा) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे रावेर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना व युवासेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियुक्तीनंतर विश्वजितराजे पाटील यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सर्व वरिष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. युवासेना कार्याध्यक्ष भाईसाहेब पूर्वेश सरनाईक, मुख्य सचिव राहुल लोंढे आणि सचिव किरण साळी यांनी आपल्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याबद्दल त्यांनी विशेष आभार व्यक्त केले. यावेळी त्यांनी शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, रावेर लोकसभा संपर्क प्रमुख आमदार तुकाराम काते, आमदार किशोर पाटील, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल पाटील, आमदार चंद्रकांत सोनवणे, माजी आमदार लता



सोनवणे, धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख माजी खासदार उन्मेश पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, शिवसेना जिल्हाप्रमुख समाधान महाजन, मार्गदर्शक डॉ. मनोहर पाटील, जामनेर तालुकाप्रमुख ॲड. भरत पवार तसेच जिल्ह्यातील सर्व तालुकाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. याशिवाय युवासेना विभागीय सचिव अविष्कार भुसे, उत्तर महाराष्ट्र समन्वयक प्रथमेश पाटील, कार्यकारिणी सदस्य किशोर भोसले, रावेर लोकसभा संपर्क प्रमुख शर्मिला येवले आणि जळगाव लोकसभा संपर्क प्रमुख निखिल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना विश्वजितराजे पाटील म्हणाले, “वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा तसेच हिंदुत्वाच्या भूमिकेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी संघटन विस्तार, युवकांना पक्षाशी जोडणे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणे हेच माझे प्रमुख ध्येय राहील.

# नशिराबाद येथे १५ जून रोजी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

## फिरते नेत्रालय’ ठरणार मुख्य आकर्षण

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील नागरिकांना डोळ्यांच्या आजारांवर आधुनिक आणि दर्जेदार उपचार सहज उपलब्ध व्हावेत या उद्देशाने जीपीएस मित्र परिवार (गुलाबराव पाटील स्कूल मित्र परिवार) आणि आर. आर. झुंझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १५ जून २०२६ रोजी नशिराबाद येथे भव्य मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया निवड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत शिवसेना कार्यालय, श्री विठ्ठल मंदिरासमोर, खालची आळी, नशिराबाद येथे पार पडणार असून परिसरातील गरजू नागरिकांना याचा मोठा लाभ होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कॅबिनेट मंत्री ना. गुलाबराव पाटील आणि युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जीपीएस मित्र परिवारामार्फत हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. या माध्यमातून आजपर्यंत मतदारसंघातील सुमारे १५ हजारांहून अधिक रुग्णांवर पनवेल येथील झुंझुनवाला हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शिबिराचे प्रमुख आकर्षण म्हणजे अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेली ‘फिरते नेत्रालय’ (मोबाईल आय क्लिनिक) व्हॅन



होय. ना. गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधेमुळे रुग्णांच्या डोळ्यांची आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागेवरच अचूक तपासणी केली जाणार आहे. शिबिरात नागरिकांना डोळ्यांची सखोल तपासणी, मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे मोफत ने-आण व्यवस्था, नशिराबाद शहरासह बेळी,तरसोद आणि मन्यारखेडे परिसरातील डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेले नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरासाठी नावनोंदणी सुरू असून इच्छुकांनी ७५१७५ ०९०९० किंवा ९८९०५ ९८१९९ या क्रमांकांवर संपर्क साधून आपली नोंदणी करावी. तसेच आज शनिवार आणि उद्या रविवार हे दोन दिवस उपलब्ध असल्याने सर्व मित्रपरिवार, शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या परिसरातील गरजू रुग्णांपर्यंत ही माहिती पोहोचवून त्यांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईस | अँकर न्यूज | ज

# आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त धुळ्यात आई एकविरा मातेची महाआरती

## शिवसेना-युवासेना पदाधिकाऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती; महाआरती व प्रसाद वाटप

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** शिवसेना नेते व युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे शहर व जिल्हा युवासेनेच्या वतीने स्थानिक आई एकविरा माता मंदिरात विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले. आदित्य ठाकरे यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभावे तसेच त्यांच्या हातून महाराष्ट्राची अखंड सेवा घडावी, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्याला शिवसैनिक, युवासैनिक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



महाआरतीदरम्यान मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. “जय भवानी, जय शिवाजी” तसेच “आई एकविरा माता की जय” अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी एकविरा मातेच्या चरणी आदित्य ठाकरे यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. वाढदिवसानिमित्त राजकीय कार्यक्रमांपेक्षा धार्मिक आणि समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य दिल्यामुळे धुळे जिल्हा युवासेनेच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. या महाआरतीचे आयोजन शिवसेना-युवासेना धुळे जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भाऊ सोनवणे, उपजिल्हाप्रमुख नानू भाऊ परदेशी, महानगरप्रमुख धीरज भाऊ पाटील, सागर भाऊ निकम, जयेश फुलपगारे, अविनाश जोंधळे, समर्थ मुर्तडक, गोपाल चव्हाण, चेतन शिंदे, सौरभ लहामगे, जयेश नाईक, कुंदन प्रजापत, प्रेम कानकाटे, दादू पाटील, हर्षल साळुंखे आणि संकेत मुर्तडक यांच्या हस्ते विधिवत महाआरती पार पडली. या प्रसंगी असंख्य शिवसैनिक, युवासैनिक, महिला कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडवून आणणारा हा सोहळा धुळेकरांसाठी विशेष आकर्षण ठरला.

### समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य

आदित्य ठाकरे यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभावे तसेच त्यांच्या हातून महाराष्ट्राची अखंड सेवा घडावी, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्याला शिवसैनिक, युवासैनिक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाआरतीदरम्यान मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. “जय भवानी, जय शिवाजी” तसेच “आई एकविरा माता की जय” अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी एकविरा मातेच्या चरणी आदित्य ठाकरे यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली.वाढदिवसानिमित्त राजकीय कार्यक्रमांपेक्षा धार्मिक आणि समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य दिल्यामुळे धुळे जिल्हा युवासेनेच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.